*IOSR Journal of Humanities And Social Science (IOSR-JHSS)*
*Volume 26, Issue 2, Series 4 (February. 2021) 50-54*
*e-ISSN: 2279-0837, p-ISSN: 2279-0845.*
*www.iosrjournals.org*

# ‘शांतता! कोर्ट चालू आहे’ नाटकातील व्यक्तिरेखा एक स्त्रीवादी आकलन

Dr. Sayli Yogesh Acharya
*Asst. Professor, Dept. of Marathi*
*HPT Arts & RYK Science College, Nashik (Maharashtra), India*

**गोषवारा**

*‘शांतता! कोर्ट चालू आहे’ हे विजय तेंडुलकर यांचे गाजलेले नाटक. कुमारी मातेचा प्रश्न या नाटकातून त्यांनी समर्थपणे हाताळला आहे. मिस. लीला बेणारे ही नाटकातील नायिका एका शाळेत शिक्षिका आहे. एका लहानश्या गावात एका ग्रुपबरोबर ती जाते, अभिरूप न्यायालयाचा कार्यक्रम तिथे होणार असतो. त्या न्यायालयाच्या तालमीसाठी बेणारेला आरोपी म्हणून उभे केले जाते व तिच्यावर कलम ३०२ अंतर्गत स्त्रीभ्रुण हत्येचा आरोप ठेवला जातो. सुरुवातीला खेळ आहे असे समजून बेणारे तिच्या मनमोकळ्या स्वभावानुसार ते हसण्यावारी घेते, परंतु काही काळाने हा खोटा आरोप नसून आपल्या वैयक्तिक आयुष्यात लुडबूड करण्याची ठरवून केलेली योजना आहे हे तिच्या लक्षात येते, व ती या व्यवस्थेविरूद्ध आवाज उठवते. पण समाज जसा स्त्रीची कोंडी करतो तशी आरोपीच्या पिंजऱ्यात ती चारही बाजुंनी वेढली जाते. समाजाच्या वाईट नजरांची कैदी होते.नाटकाच्या शेवटी स्वगतातून तिच्या मनोव्यापाराचे खरे दर्शन घडते. मंगळसूत्र गळ्यात नसलेल्या आणि एकट्या राहणाऱ्या स्त्रीकडे समाजाची पाहण्याची दृष्टी कशी असते याचे तेंडुलकरांनी हुबेहुब दर्शन घडविले आहे.*

**महत्त्वाचे शब्द**

*मनोव्यापार, पर्सोना, शोकांतिका, मूकसंवाद, स्वगत, आंतरिक उलाघाल, स्त्रीवादी आयाम*

---

Date of Submission: 29-01-2021 Date of Acceptance: 14-02-2021

---

## प्रस्तावना

शांतता !कोर्ट चालू आहे हे विजय तेंडुलकर लिखित तीन अंकी नाटक आहे. हे नाटक म्हणजे कु. लीला बेणारे या पात्राची शोकांतिका आहे. व्यक्ती विरूद्ध समाज हा विषय तेंडुलकरांच्या लेखणीचा विशेष म्हणावा लागेल. माणसाचे एकाकीपण, समाजाच्या क्रूर, भेदक नजरा माणसाच्या एकाकीपणास कशा जन्म घालतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे शांतता! कोर्ट चालू आहे हे नाटक.

## संशोधनाचा हेतू

एका बाजूला व्यक्तीची असहाय्यता, हतबलता तर दुसऱ्या बाजूस समाजाची दांभिकता, क्रूरता यांचे दर्शन घडविणाऱ्या ‘शांतता! कोर्ट चालू आहे’ सारख्या नाटकातील स्त्रीपात्रांच्या वर्तनामागील कारणमीमांसा शोधणे हे प्रस्तुत अभ्यासाचे उद्दिष्ट्य आहे. स्त्रीची विविध रूपे असतात. एकटी राहणारी स्त्री समाजाच्या विकृत नजरांची बळी ठरते, स्त्रीच स्त्रीची याबाबत कशी शत्रू ठरते यामागील सामाजिक मानसिकता तसेच अन्यायाविरूद्ध आवाज उठवू पाहणारी परंतु समाजाच्या दांभिकतेचा बळी ठरू पाहणारी स्त्री, तिचा मनोव्यापार, तिची आंतरिक उलाघाल, तिची कोंडी आणि ती फोडण्यासाठी तिने केलेली यातायात यांचा अभ्यास करणे संशोधकाची भूमिका आहे. वरवर खेळकरपणे वावरू पाहणारी स्त्री कशी अंतर्मुख होत जाते, समाजाच्या दुष्ट नजरांची कशी व का बळी ठरत जाते यामागील सामाजिक वर्तनांची मीमांसा करणंही प्रस्तुत अभ्यासात अनुस्यूत आहे.

## संशोधन पद्धती

- ➢ स्त्रीवादी समीक्षापद्धती
- ➢ मानसशास्त्रीय समीक्षापद्धती
- ➢ आदिबंधात्मक समीक्षापद्धती

**विषयप्रवेश**

'शांतता !कोर्ट चालू आहे' हे नाटक शीर्षकाप्रमाणेच एका कोर्टाच्या वातावरणात मग ते खोटे (काल्पनिक) कोर्ट का असेना अशा वातावरणात रंगलेले नाट्य आहे. जागृती-सभेची ही मंडळी एका लहानश्या गावातील एका लहान हॉलमध्ये जॉन्सन यांच्यावर खटला भरण्यासाठी अभिरूप न्यायालयाचा कार्यक्रम सादर करण्याच्या दृष्टीने पोहचतात. रात्री इतर लोक हे न्यायालयाचे कामकाज कसे चालते हे पहायला येणार म्हटल्यावर लवकर पोहचलेली ही मंडळी फावल्या वेळेत नाटकाची तालीम करायची ठरवतात. पण ती तालीम साधीसुधी नक्कीच नव्हती हे नाटक संपत आल्यावर आपल्याला उलगडत जाते. खेळाच्या निमित्ताने बेणारे बाईच्या चारित्र्यावर ओढले गेलेले ताशेरे, तिचे काढलेले वाभाडे याचे दर्शन या नाट्यातून घडते. हॉलमध्ये सगळयांच्या आधी पाऊल ठेवणारी कु. लीला बेणारे या नाटकाची नायिका आहे. हे नाटक म्हणजे या बेणारेची शोकांतिका आहे. हसतखेळत अनोळखी माणसालाही आपलेसं करून घेणारी लीला बेणारे गावातील हॉल दाखवायला आलेल्या सामंत नावाच्या गृहस्थाबरोबर हॉलमध्ये प्रवेश करते व मागून येणाऱ्या आपल्या बाकीच्या सहकाऱ्यांविषयी, नाटकातील इतर पात्रांविषयी त्यांच्या नाटकातील भूमिकांसह सामंतला परिचय करून देते. बोलता बोलता ती काही वाक्ये अशी उच्चारते की ज्यांचा अर्थ काहीही माहीत नसलेल्या सामंतांना कळत नाही परंतु पुढे घडणाऱ्या नाट्याची ती नांदी ठरते.

**शांतता! कोर्ट चालू आहे : प्रभावी आशय**

तेंडुलकरांनी या नाटकातून संभावित समाजाकडून करण्यात आलेली व तारूण्यसुलभ वासनेला बळी पडलेल्या प्रौढ कुमारिकेची कोंडी चित्रित केली आहे. ही कोंडी तिचा आक्रोश मांडते. लुटुपुटूच्या नाट्याचा हळूहळू दारूणतेत, क्रूरतेत शेवट व्हायला लागतो. समाजाच्या दाहक नजरांची ती बळी ठरते, प्रत्येक गोष्ट सुरुवातीस हसण्यावारी नेत असलेली बेणारे काही वेळाने सजग होते, आपण आता पुरत्या कोंडीत अडकलो आहोत याची जाणीव होऊन ती कोंडी फोडण्यासाठी प्रयत्न करू लागते. मात्र तिला बाहेर न पडू देता धक्के देऊन पुन्हा पिंजऱ्यात ढकलले जाते. यावरूनच हे लक्षात येते की हे केवळ बेणारेचे वृत्त कथन करणारे नाटक नाही तर समाजातील अशा परिस्थितीच्या भोवऱ्यात अडकलेल्या व समाजाच्या विकृत नजरांची शिकार होऊ पाहणाऱ्या हजारो स्त्रियांची ही कहाणी आहे.

न्यायालयाचे कामकाज ज्या सभागृहात होणार आहे त्या सभागृहात बेणारे सामंतांबरोबर प्रसन्नचित्ताने प्रवेश करते. त्यांची हसत हसत ओळख करून घेते. सामंतांच्या हातात एक कादंबरी व एक खेळण्यातील पोपट असतो. (ज्याचे संदर्भ आपल्याला नंतर कळत जातात) क्षणाक्षणाला मूड बदलणारी, कवितेच्या ओळी गात आपल्याच विश्वात दंग वाटणारी बेणारे सामंतांच्या कुतुहलाचा विषय बनलेली दिसते. काही वाक्यांतून तिची बंडखोरीही जाणवते. सतत कुठल्यातरी दडपणाखाली ती वावरते आहे असाही आभास निर्माण होतो. ती बोलताना तिच्या मनातील संघर्ष, तणाव, द्वंद्व भावना आपल्याला जाणवतात. उदा. "पण माझं काय करणार ते ? काय करणार ? करून करून काय करतील ? हूं:! चौकशी करताहेत !माझ्या शिकवण्यात तर मी चोख आहे. प्राण ओतून मी शिकवते – रक्ताचं पाणी केलंय मी या नोकरीत ! केवळ एक आरोप सिद्ध झाला म्हणून काय करतील ? ते काढून टाकतील ? टाकू देत. मी कुणाचं वाईट नाही केलेलं... मी केलं असलं तर माझंच वाईट केलं आहे...मी माझं काय करायचं ते हे कोण ठरवणार ? माझं आयुष्य हे माझं आहे- नोकरीसाठी विकलेलं नाही मी ते कुणाला...."[1] अशा वाक्यांतून तिची अगतिकता व्यक्त होते अर्थात तिच्या या वाक्यांचा अर्थ स्वाभाविकपणेच सामंतांना काही कळत नाही. कारण तो आणि वाचकही तिच्या पार्श्वभूमीशी अपरिचित आहेत. अर्थात तिच्या चेहऱ्यावरचे पटापट बदलणारे भाव, तिची अंतर्मुखता, तिच्या तोंडी असणारे संवाद, कवितेच्या ओळी यातून हे काहीसं वेगळं निश्चित आहे हे काहीअंशी लक्षात येते. तरीही दुसऱ्या अंकापासून तिच्या या बोलण्याचा अर्थ बराचसा उलगडायला सुरुवात होते. तिच्या भाषेत ती सामंतांना येणाऱ्या पात्रांबद्दल ओळख करून देते. समाजसेवा करणारे काशीकर (अध्यक्ष) जे न्यायाधीशाची भूमिका पार पाडणार असतात, सौ. काशीकर एक अपत्यहीन गृहीणी, त्यांनी पाळलेला लाचार मुलगा म्हणजे बाळू रोकडे, वकिली न चालणारे सुखात्मे, पाईप हाती धरून साक्षीदाराचे काम करणारे पोंक्षे, कर्णिक तसेच प्रो. दामलेंविषयी सांगतांना मात्र इंटेलेक्चुअल प्रो. दामले आलेले नाहीत कारण छाती नाही त्यांची असेही ती उद्गारते. ही सर्व मंडळी आल्यावरही ती हसत हसत त्यांना भरपूर टोमणे मारते. तिच्या या वक्तव्यातून तिचे आतून दुखावलेले असणे, तिची सल याची थोडीफार कल्पना येते. मिसेस काशीकरांनी तुझी शाळा काय म्हणते विचारल्यावर काही नाही म्हणत तिचा विषय टाळणे बोलके आहे. तसेच सायंटिस्ट पोंक्षे तिला तिच्या त्यांच्याशी लग्न करू इच्छिणाऱ्या मैत्रिणीविषयी विचारतात तेव्हाही तिचा विषय टाळणे सूचक आहे.

साध्या सरळ स्वभावाचे वाटणारे सामंत यांना कोर्टाच्या कामकाजाबद्दल काहीही माहिती नाही मात्र कुतुहल आहे म्हणूनच त्यांना कामकाज कळावे व वेळही जावा यासाठी ही मंडळी तालीम करायची मात्र जॉन्सन यांच्यावरच तालमीत केस न चालवता वेगळा विषय घ्यावा असेही ठरते. फ्रेश होण्यासाठी बेणारे आतल्या भागात गेली असता पोंक्षे व कर्णिक यांच्यात काही संवाद होऊन वेगळा सामाजिक विषय घेण्याचे ठरते व बेणारे बाहेर आली असता तिला लगेच आरोपीच्या पिंजऱ्याकडे जाण्याचे निर्देश देत स्त्रीभ्रुण हत्येचा आरोप तिच्यावर ठेवला जातो. ती नसताना या मंडळींमधली कुजबूज, त्यांचे आविर्भाव यातून तिच्याविरोधात काहीतरी खलबत सुरू आहे याची जाणीव आपल्याला होते. आपल्यावर झालेला आरोप ऐकून तिच्या चेहऱ्यावरील भाव झपाट्याने बदलतात व इथेच पहिला अंक संपतो.

दुसऱ्या अंकात हा खेळ असून तो खोटा आहे असे प्रत्येकजण भासवतो त्यामुळे बेणारे काहीशी सावरते. उलट जज्ज, वकील यांनाच टोमणे मारते. इथपर्यंत तिच्या पूर्वायुष्याबद्दल किंवा तिच्याबद्दल अधिक काहीही तपशील वाचकाला कळलेला नाही. सुखात्मे यांचे वकील म्हणून पहिले भाषण होऊन साक्षीदार तपासणी सुरू होते. पहिला साक्षीदार म्हणजे पोंक्षे बेणारेने आपले लग्न जमविल्याचे सांगतो. तसेच तिची वागणूक तऱ्हेवाईक असल्याबददलही बोलतो. त्यामुळे नंतर येणाऱ्या साक्षीदाराला, कर्णिकला तिच्या नैतिक वागणूकीविषयी विचारले जाते. कर्णिक रोकडेला साक्षीदार म्हणून गोवतो. बाळू रोकडे बेणारेला आपण प्रो. दामल्यांच्या खोलीत संध्याकाळी पाहिल्याचे सांगतो. काशीकर परत अशा खासगी गोष्टी न बोलणे योग्य असे म्हणतात परंतु सुखात्मे हा मुद्दा ताणून धरतात. यावर बेणारे चिडते. पण आरोपी मात्र खरा व बाकी सगळा खेळच म्हणजे सगळे खोटे असे मत सगळे व्यक्त करतात. मनातून मात्र त्यांना बेणारेच्या खासगी जीवनाबद्दल कमालीची उत्सुकता असते. पुढचा साक्षीदार म्हणून सामंतला उभे केले जाते. सगळयांच्या खेळाच्या आग्रहापोटी तो खोटे आहे असे समजून बेणारेचा आवाज दामल्यांच्या खोलीतून ऐकू आल्याचे ठोकून देतो. सगळयांनी तपशील विचारताच काही वाक्ये सामंत त्या संभाषणातील ऐकल्याचे सांगतात. ती वाक्ये खरेतर त्यांच्या हाती असलेली सूर्यकांत फातरफेकर या लेखकाच्या कादंबरीतील असतात. या कादंबरीचा उल्लेख हॉलमध्ये प्रवेश केल्यावर सुरुवातीला त्यांनी बेणारेसमोर केलेला असतो. ती वाक्ये ऐकताना मात्र बेणारे अस्वस्थ होते.त्यातील सारांश बेणारेला दिवस गेले असून दामले तिला टाळत आहेत असा असतो ते ऐकून बेणारे भडकते,रडते.तिला होऊ घातलेल्या कटाचा संशय येतो व ती रागाने आत निघून जाते. या कृतीमुळे आता सर्वचजण काय घडले आहे हे जाणून घेण्यासाठी आतुर होतात. बेणारे आता सामान उचलून बाहेर जाण्याचा प्रयत्न करते मात्र दार बाहेरून बंद झालेले असते. अशारीतीने ती या लोकांच्या गराड्यात सापडते. खेळ असाच सुरू रहावा हा साऱ्यांचा आग्रह असतो. परंतु विनोदी, उपहासात्मक प्रसंगांना आता गांभीर्याची झालर चढते.

तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीस मात्र बेणारे भयभीत झालेल्या जनावरासारखी पिंजऱ्यात ढकलली जाते. परिस्थितीपुढे हतबल होते. बोलण्यास साफ नकार देते. आता सौ. काशीकरांची साक्ष काढली जाते. त्या बेणारेच्या नोकरीबाबत, तिच्या मनमोकळया वर्तनाबाबत टीका करत तिने रोकडेशी अतिप्रसंग केल्याचे खळबळजनक वृत्त देतात. पुन्हा रोकडेची साक्ष काढली जाते. एका रात्री बेणारेने आपला हात धरला, त्याने सौ. काशीकरांना सांगण्याची धमकी दिली तसेच स्वतःचा गाल चोळत आपण बेणारेच्या श्रीमुखात दिली असेही सांगतो. समुहाचा हिंस्त्रपणा असा वाढू लागतो. आता पोंक्षे परत साक्षीला येतात. बेणारे आपल्या पर्समध्ये नेहमी टिकट्वेंटी ची बाटली ठेवते असे सांगून तिने आपली भेट एका खासगी हॉटेलमध्ये घेतल्याचे सांगतो. असहाय्यपणे ती त्याला ही गोष्ट इथे न सांगण्याचे विनवते. मात्र आता सर्वजण त्याला आग्रह करतात. तेव्हा प्रेमभंग झालेल्या, दिवस गेलेल्या मैत्रिणीशी त्यांनी विवाह करावा असे बेणारेने सुचविल्याचे सांगून ती मैत्रीण दुसरीतिसरी कुणीही नसून खुद्द बेणारेच आहे, व तो गर्भ, ते मूल दामल्यांचे आहे असे पोंक्षे सांगतात. या बातमीने प्रचंड खळबळ उडते, बेणारे अर्धमेली होते. नंतर पुन्हा कर्णिक साक्ष देण्यास येतो. बेणारे – रोकडेचा संवाद आपण ऐकल्याचे तो सांगतो. बेणारेचा मावसभाऊ त्याच्या ओळखीचा असतो. तिने पंधराव्या वर्षी स्वतःच्या मामावर प्रेम केल्याचे आणि ते अयशस्वी होताच आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे कर्णिक सांगतो. हे तिच्या मावसभावाकडून कळल्याचे तो सांगतो. बेणारे आता पुन्हा बाहेर जाऊ लागते पण सौ. काशीकर तिला पिंजऱ्यात ढकलतात. यानंतर मि. काशीकर स्वतः साक्ष देतात. बेणारे ज्या शाळेत नोकरी करते त्या शाळेच्या संचालक मंडळातील नानासाहेब शिंदेंच्या भेटीस काशीकर गेले असता, आतून आलेला बाईंचा आवाज, संभाषणातून तिने आपल्याबाबत चौकशी करू नये अशी त्यांना केलेली विनंती यावरून ती बेणारेच असावी असा युक्तिवाद ते करतात. आपली नोकरी जाणार हे ऐकून ती व्यथित होते. तिचे संपूर्ण खासगी जीवन खेळाच्या नावाखाली असे उघड केले जाते. ती विष पिण्याचा प्रयत्न करीत असता ती बाटली तिच्या हातून काढून घेतली जाते. समाज अशा बळी ठरेल्या बाईला धड जगूही देत नाही अन् सुखाने मरूही देत नाही याचे हे उदाहरण ठरते. सुखात्मे आपल्या वकिली भाषणात समाजाला झुगारून मूल वाढवण्याच्या तिच्या घेतलेल्या निर्णयाला वाईट ठरवतो, व तिला जबर शिक्षा व्हावी अशी कोर्टाला विनंती करतो. बेणारेला आता काही सांगायचे आहे का? असा प्रश्न विचारला जातो. ती मान खाली घालून मुसमुसत असते. तिला बोलण्यासाठी दहा सेकंद दिले जातात.

ती सून्न झालेली आहे. मनातून तिला खूप काही बोलायचे आहे परंतु शब्द फुटत नाहीत. इथे रंगमंचावर ती एकटीच प्रकाशझोतात आहे अशी योजना केली आहे. तिच्या मनातील असंख्य भाव-भावनांची आंदोलनं, तिचे कारूण्य, तिच्या वेदना, तिची हतबलता, नैराश्य, दुःख तिच्या चेहऱ्यावर ओसंडते आहे. आता तिचे स्वगत सुरू होते. तिसऱ्या अंकातील तिचे हे मूकसंवाद (स्वगत) म्हणजे नाटकाची शिरोरेषा आहे. घड्याळाची टिक टिक सुरू होते.

भूतकाळातील तिचे अनुभव, स्वतःच्या मामाकडून ती फसवली जाणे, प्रेम म्हणजे काय हे कळण्याच्या आतच पुरुषी वर्चस्वापुढे तिचे खुडले जाणे, मामाने तिला एकटीला सोडून जाणे, फसविणे, शारीरीक सुख भोगून नंतर तिला वाऱ्यावर सोडणे, तिचे अनुभव, घरच्यांचा विरोध, नंतर मात्र प्रगल्भावस्थेत तिने दामल्यांवर केलेले बौद्धिक प्रेम मात्र त्यांनाही तिचे केवळ शरीर हवे असणे, हे शरीरच तिचा घात करते. मात्र त्या आतल्या जीवाचा यात काय दोष असे ती म्हणत त्याच्यासाठी हे शरीर जिवंत ठेवणं मला भाग आहे, या शरीराने मला क्षणिक सुखही दिले आहे असेही ती मान्य करते. शाळा, तेथील मुलं हीच तिचा विरंगुळा आहे, तो तरी तिच्याकडून काढून घेऊ नये असेही ती विनवते. पोटातील गर्भ तिला मानाने वाढवायचा असतो पण – हा 'पण'च काही न बोलता खूप काही सांगून जाणारा आहे. हे तिचे मूकनिवेदन टिकटिकीसोबत संपते तेव्हा खरंच ती या सगळयात कितपत दोषी आहे हा विचार आपल्याला अस्वस्थ करतो. नोकरीतील तिचा प्रामाणिकपणा, मुलांना तिने जीव तोडून शिकवणं यापुढे

तिच्या खासगी आयुष्याचा असा बाजार मांडला जाण्याची आवश्यकता होती का ? असाही प्रश्न पडतो. तेव्हा सुरुवातीला तिने सामंतांना उद्देशून,'माझ्या आयुष्याचं काय करायचं ते मी ठरवीन' या वाक्याचा अर्थ कळत जातो. तिचा जरी या प्रकारात दोष होता तरी तो तिचा एकटीचा होता का ? हा प्रश्न उरतोच. स्वगतानंतर जेव्हा ती अगतिकतेने रडू लागते तेव्हा मानभावीपणे सारेजण हा खेळच तर होता, त्यात एवढं मनाला काय लावून घ्यायचं ?अशी सारवासारव करतात. निकालात मात्र काशीकरांनी तो गर्भ पाडण्याची शिक्षा फर्मावलेली असते. सामंत आपल्या हातातील आधीच आणलेला पोपट बेणारेजवळ टेबलवर ठेवून निघून जातो. आता दाराची कडी उघडलेली असते, प्रेक्षक बाहेरून आत डोकावतात व नाटक इथेच संपते.

**बेणारेचे मुखवट्यामागील दुःख**

आदिबंधात्मक संकल्पनेतील 'पर्सोना' या संकल्पनेची काहीशी प्रचिती या नाटकात बेणारेच्या रूपात येते. माणसाला विविध कारणांनी समाजात वावरताना एक वेगळा मुखवटा धारण करावा लागतो असे ही 'पर्सोना' नामक संकल्पना सांगते. तसे तर या नाटकातील सामंत वगळता सर्वच पात्रे आपला एक वेगळा मुखवटा धारण करून आहेत, हे मुखवटे नाटकाच्या उत्तरार्धात गळून पडतात.अगदी आनंदी, स्वतःच्याच विश्वात रमणारी, नाटकाच्या सुरुवातीला हसतखेळत अगदी कवितेच्या ओळी गुणगुणत सभागृहात शिरलेली बेणारे खूपदा अंतर्मुख होऊन काहीतरी बोलते ते सुरुवातीला विसंगत वाटले तरी उशिराने त्याचे अर्थ उलगडत जातात. सगळया आलेल्या मंडळींना उद्देशून आपल्या बालपणीची गंमत सांगताना ती आपल्या वहीवर लिहिलेल्या कवितेच्या सुंदरश्या ओळी सांगते की,"द ग्रास इज ग्रीन- द रोज इज रेड – धिस बुक इज माईन – स्टिल आय ॲम डेड"[2] असे सांगत ती पुढे म्हणते की, 'द ग्रास इज स्टील ग्रीन – द रोझ इज स्टील रेड- पण एकेक वही फाटत कुठे गेली काय माहीत बट आय ॲम नॉट डेड - पण तरी मी आहे',असे म्हणत हसत सुटते. तिच्या या वाक्यांतून दुःखाची छटा आता खऱ्या अर्थाने गहिरी होत जाते. सामंतांच्या हाती खेळण्यातील असलेला लाकडी हिरवा पोपट सुरवातीला आपल्याला फारसा महत्त्वाचा वाटत नाही परंतु नाटक संपताना तो पोपट तिथेच ठेवून जातो यातून एक सत्य उलगडत जाते की वर्षानुवर्षे पिंजऱ्यात बंदिस्त, पाळलेला पोपट नंतर स्वातंत्र्याची जाणीव झाली तरी आणि पिंजऱ्याचे दार मालकाने उघडे टाकले तरी उडून जाण्यास असमर्थ ठरतो. पंख छाटल्यागतच त्याची अवस्था होते. बेणारेची गत अशीच झाली आहे. नाटकाला खेळ ठरवत सगळयांनी तिच्या आयुष्याचे मात्र धिंडवडे काढले आहेत. सुरुवातीला तिला पिंजऱ्यात ढकलणारा हा दांभिक समाज खेळ खेळ म्हणत, खऱ्या अथवा खोट्या साक्षींचा आधार घेत तिच्याही नकळत तिचे खासगी आयुष्य चव्हाट्यावर आणतो. मात्र सुरुवातीला बाहेर पडण्याची यातायात करणारी ती नंतर दार उघडले गेल्यावरही हतबल ठरते, असहाय्य, शून्यवत ठरते.

**स्त्रीवादी आयाम**

नाटकातील घडलेले किंबहुना ठरवून घडवून आणलेले हे नाट्य केवळ बेणारेचा मुखवटा उतरवत तिच्या खासगी आयुष्याचे वाभाडे काढण्यासाठीच घडवले गेले आहे याची प्रचिती उत्तरार्धात आपल्याला येते. समाजाने एका स्त्रीविरूद्ध ठरवून केलेले हे कारस्थान आहे. एकट्या राहणाऱ्या तेही बिनलग्नाच्या स्त्रीविरोधात समाज कसा डोळयात तेल घालून नजर ठेवून असतो, तिच्या खासगी आयुष्यात लुडबूड करण्याचा आपणास काही अधिकार नाही याचा विसर या सुशिक्षित समाजालाही पडतो. आणि सौ. काशीकरांच्या रूपाने तर पारंपरिक श्रद्धा बाळगणारी, साचेबद्ध विचार करणारी, दुसऱ्या स्त्रीचे मन समजून न घेता उलट तिच्या आयुष्यातील विसंगती, दोष शोधत त्यावर गप्पा करण्यात रस असलेली स्त्री तेंडुलकरांनी रंगवली आहे. पुरुषांपेक्षाही तिचे खासगी आयुष्य जाणून घ्यायला ही स्त्रीच कशी उत्सुक आहे, याचे चित्रण नाटकात अनेक प्रसंगांतून येते. एक टिपिकल, मध्यमवर्गीय स्त्री मिसेस काशीकरांच्या रूपात इथे पहायला मिळते. तिला दुसऱ्या स्त्रीचे दुःख, हतबलता जाणवत नाही, ती तिला आधार देण्याचाही प्रयत्न करीत नाही. उलट दांभिक समाजाचाच ती एक भाग बनते.

बेणारे मात्र वरवर पाहता उथळ, निरागस, हसतमुख वाटत असली तरी मनातून ती उद्ध्वस्त झालेली, दुःखी आहे. तिच्यावर सातत्याने कसलेतरी दडपण आहे. पण ती परिस्थितीला शरण जाणारी नाही, सहजासहजी हार मानणारी नाही. 'माझ्या आयुष्याचं मी काय हवं ते करीन, तो अधिकार मी कुणालाही दिलेला नाही', या वाक्यातून तिचा ठामपणा कळतो. अन्याय झाला असला, बालपणापासून फसवली गेलेली असली तरी ती तिच्या ध्येयाशी निश्चल आहे, प्रामाणिकपणे हाडाची शिक्षिका बनत मुलांशी प्रेमाने जोडली गेलेली आहे. तिचा मार्ग तिने स्वतःच निवडला आहे. ती लाचार झालेली नाही, दुबळी ठरलेली नाही. मात्र पुढे येणाऱ्या परिस्थितीची ती शिकार ठरवली जाते. स्त्रीने कितीही ताठ मानेने जगायचा प्रयत्न केला तरी समाज तिला तसे जगू देत नाही. त्यात तिच्या आयुष्यात असे काही चढउतार असल्यास तर नाहीच नाही अगदी ती निष्ठेने आपलं कर्तव्य पार पाडत असली तरीही -याचं जिवंत चित्रण आपल्याला इथे पहायला मिळतं.

बेणारेचं एक स्त्री म्हणून आणि एकाकी ठरलेली स्त्री म्हणून असलेलं दुःख, मात्र त्यावर हसतखेळत ती करू पाहणारी मात, तिचा मूक आक्रोश, नंतर खेळाच्या रूपात तिची झालेली कोंडी, ती भेदण्यासाठी तिने केलेली यातायात, तिचं कारूण्य, काशीकरांसारख्या एका स्त्रीनेही तिची साथ न दिल्याने तिचं वाढत गेलेलं एकटेपण, तिचा स्वगतातून व्यक्त झालेला मनोव्यापार, तिच्या वाट्याला आलेली पुरुषी दांभिकता, तिची झालेली फसवणूक, नोकरी टिकवण्याचा तिचा अट्टाहास, पोटातील मूल

वाढवण्यासाठी तिचं ओठावर आलेलं मातृत्व यातून तिचं माणूसपण सिद्ध होत जातं. समाजाने तिला वेशीवर आणून टाकलं तरी माझ्या कामाशी मी नेहमीच प्रामाणिक आहे हे जगाला ओरडून सांगण्याची तिची धडपड, परखडपणे तिने मी एकटीच या साऱ्याला जबाबदार कशी? हे विचारलेले प्रश्न तिच्या आत्मभानाची साक्ष देतात. खोट्या, टपलेल्या समाजव्यवस्थेविषयीचा कडवटपणा तिच्या अनेक वाक्यांतून जाणवतो पण तिच्या मनाचा होणारा कोंडमारा, घुसमट व्यक्त करताना तिच्या संवादांना चढलेली धारही वाचकाला अस्वस्थ करते. ती केवळ अन्याय सहन करीत, रडत बसणारी बाई नाही तर शेवटपर्यंत आपल्या सुटकेसाठी धडपडणारी, आपल्या अस्तित्वासाठी लढणारी ती एक स्वतंत्र विचारांची माणूस आहे हे वागण्यातून सिद्ध करते.

**समारोप**

भोवतालचा पुरुषप्रधान समाज स्वतःच्या पायावर उभ्या असलेल्या स्वतंत्र स्त्रीलाही पुरुषी वर्चस्वापुढे कसा नामोहरम करू पाहतो, तिच्या आयुष्यातील करूण प्रसंगांचा फायदा घेत तिला कसा घायाळ करतो याचे उत्तम दर्शन तेंडुलकर यातून घडवतात. अशा दांभिक समाजाची बळी ठरलेली बेणारे ही एकटी बाई नाही. आपले काम प्रामाणिकपणे करू पाहत स्वतःचे दुःख बाजूला सारण्याचा प्रयत्न करणारी बेणारी ही एक प्रातिनिधिक व्यक्तिरेखा आहे. समाज स्त्रीच्या खासगी आयुष्यात डोकावण्यासाठी कसा टपलेला असतो, तिच्या बऱ्यावाईट कृत्यांची कशी तो नोंद ठेवतो, खेळाच्या रुपात का होईना पण तिला समाजाच्या नजरेत अपराधी ठरवून शिक्षा सुनावून मोकळा होतो याचे विदारक चित्रण म्हणजे 'शांतता! कोर्ट चालू आहे' हे नाटक.

**निष्कर्ष**

- लीला बेणारे या पात्राच्या रूपात पुरुषप्रधान समाजात स्वतःची वाट चोखाळत, दुःखावर मात करीत अन्यायाविरूद्ध लढू पाहणाऱ्या स्त्रीचे चित्रण येते.
- बेणारेच्या अनेक वाक्यांतून तिचे जागे झालेले आत्मभान, तिच्यातील माणूसपण, तिच्यातील कोमल स्त्रीत्व यांची जाणीव होते.
- समाजाविरूद्ध एकटेपणाने परंतु ताठ मानेने लढा देऊ पाहणारी परंतु चारी बाजुंनी कोंडी झाल्याने हतबल ठरलेली स्त्री नाटकातून चित्रित होते परंतु जाता जाता ती तिच्या अस्तित्वाविषयी, स्वातंत्र्याविषयी अनेक प्रश्न उपस्थित करून वाचकांना अस्वस्थ करते.
- अनेकदा लहानपणापासून आपल्या स्वप्नांचं, स्त्रीसुलभ इच्छांचं दमन तिला करावं लागलं आहे असे असतानाही हसतमुखाने वावरणारी, आपलं काम चोखपणे पार पाडणारी बेणारे ही आत्मसन्मानाच्या वाटेवर पावलं टाकू पाहणारी आहे. केवळ समाजाच्या वेढलेपणाने ती असहाय्य ठरते परंतु ती हार मानत नाही. एक माणूस म्हणून ती अधिक नजरेत भरते.

**संदर्भ सूची**

१. तेंडुलकर, विजय, शांतता! कोर्ट चालू आहे, प़ॉप्युलर, सहावी आवृत्ती, २००३, पृष्ठ ५.

२. तेंडुलकर, विजय, शांतता !कोर्ट चालू आहे, प़ॉप्युलर, सहावी आवृत्ती, २००३, पृष्ठ १०.